Estd : 1962
NAAC 'A' Grade

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA**
PHONE :EPABX- 2609000, (Inquiry Cell) 2609143, (EST) 2609097, 98, 99
**FAX :0091-0231-2691533 & 0091-02312692333**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स)2609000, (चौकशी कक्ष), 2609143 (राष्ट्रीय सेवा योजना),2609176
फॅक्स : 0091–0231–691533 व 0091 – 0231–2692333

संदर्भ.जा.क्र./शिवाजी वि./रा.से.यो./ई–मेलद्वारे                                        दिनांक : 24/09/2019

| | |
|---|---|
| मा. प्राचार्य / प्राचार्या<br>राष्ट्रीय सेवा योजना,<br>सर्व संलग्न महाविद्यालये,<br>कोल्हापूर शहर | मा. अधिविभागप्रमुख,<br>राष्ट्रीय सेवा योजना संलग्न अधिविभाग,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |

**विषय : 28 सप्टेंबर, 2019 रोजी पर्यावरण जागृतीसाठी आयोजित जनजागरण फेरीमधील सहभागाविषयी.....**

**संदर्भ : फायडे फॉर फ्युचर – महाराष्ट्र यांचेद्वारे दिनांक 23/09/2019 रोजी प्राप्त पत्र...........................**

महोदय / महोदया,

वरील विषय व संदर्भान्वये पर्यावरण जनजागृतीसाठी फ्रायडे फॉर फ्युचर (FFF) ही मोहिम मुलांनी जगभर चालविली आहे. 170 देशांमध्ये 20 ते 27 सप्टेंबर दरम्यान अनेक पर्यावरणपूरक उपक्रम चालू आहेत. या मोहिमेअंतर्गत कोल्हापूरात दिनांक 28 सप्टेंबर, 2019 रोजी दसरा चौक, कोल्हापूर येथून दुपारी 3:15 वाजता जनजागरण फेरीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी याकरीता आपल्या महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थीनी स्वयंसेवकांसह सदर जनजागरणफेरीस दिनांक 28 सप्टेंबर, 2019 रोजी दसरा चौक, कोल्हापूर येथे दुपारी 3:15 वाजता उपस्थित राहून सक्रीय सहभाग नोंदवावा ही विनंती.

कळावे,

सोबत – संदर्भिय पत्र

आपला विश्वासू

(प्रा.डॉ. डी. के. गायकवाड)
प्र–संचालक, रा.से.यो.

\SUBMISSION 2015-16\CIRCULAR – University Letter Head - Pg.1

**फ्रायडे फॉर फ्युचर - महाराष्ट्र**
कार्बन फूटप्रिंट कमी करण्याची लोकचळवळ

प्रति,
**मा. डॉ डी के गायकवाड सर,**
**प्रसंचालक,**
**राष्ट्रीय सेवा योजना विभाग,**
**शिवाजी युनिव्हर्सिटी,**
**कोल्हापूर.**

विषय: 28 सप्टेंबर रोजी पर्यावरण जागृतीसाठी कॉलेज विद्यार्थ्यांची जनजागरण फेरीबाबत.

महोदय,

पर्यावरण जागृतीसाठी फ्रायडे फॉर फ्युचर (FFF) ही मोहीम मुलांनी जगभर चालविली आहे. 170 देशांत 20 ते 27 सप्टेंबर दरम्यान अनेक उपक्रम चालू आहेत. ह्या मोहिमेअंतर्गत कोल्हापुरात 28 रोजी एक जनजागरण फेरी आयोजित केली आहे.

तरी शहरातील सर्व कॉलेजना

या मध्ये सहभागी होण्यासाठी आदेश दिले जावेत, हि नम्र विनंती।

जनजागरण फेरीचा मार्ग दसरा चौक बिंदू चौक असा राहील.


दिनांक: शनिवार 28 सप्टेंबर

वेळ: सायंकाळी 3.30 ते 6

समारोप ठिकाण: बिंदू चौक

वरील उपक्रमात शहरातील सर्व कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिट्सना सहभागी होण्याचे आपल्याकडून आदेश देण्यात यावेत, ही नम्र विनंती।

Send to 108 city colleges
[signature] 23/9/19



## फ्रायडे फॉर फ्युचर - महाराष्ट्र

कार्बन फूटप्रिंट कमी करण्याची लोकचळवळ

- इंग्लंड,फ्रांस, कॅनडा सहित पाच विकसित देशांनी पर्यावरणीय आणीबाणी जाहीर केली आहे. 775 महानगरपालिका यांनी पर्यावरणीय आणीबाणी जाहीर केली आहे. WHO सहित 77 जागतिक आरोग्य संघटनांनी 'जागतिक आरोग्य आणीबाणी' जाहीर केली आहे.

- 11 जुलै 2019 रोजी युनो च्या पुढाकाराने, जगभरातील 7,000 विद्यापीठे आणि महाविद्यालये यांनी ग्लोबल वॉर्मिंग व हवामानबदलाची गंभीरता ओळखून आणीबाणी जाहीर केली आहे, आणि त्याच्याशी लढा देण्यासाठी विद्यार्थ्यांसोबत 3 तीन कलमी कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यांनी जगातील सर्व विद्यापीठांना त्यांनी यात सामील होण्याचे आवाहन केले आहे.

- शतकातून एखादवेळी होणारी ढगफुटी भारतात ऑगस्ट मध्ये आठ दिवसात 33 शहरात झाली. अर्धा भारत पाण्यासाठी तडफडतोय आणि अर्धा पुरामुळे।



- पुढील 5 वर्षात मोठे उपाय नाही केले तर, पेल्या 20 वर्षात मानवजात नष्ट होण्याचे इशारे शास्त्रज्ञ देत आहेत. अजून बेसावध राहिलो तर आत्ताची लहान मुले कधीच वृद्ध होणार नाहीत; त्याआधीच नष्ट होतील।


- ग्रेटा थनबर्ग या 15 वर्षाच्या मुलीमुळे फ्रायडे फॉर फ्युचर मोहिम ऑगस्ट 2018 ला सुरू झाली. जगभरातील 50 लाख पेक्षा अधिक मुले यात सहभागी आहेत.

- यात 20 ते 28 सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या जागतिक मानवी साखळीमध्ये 170 देशातील मुले भाग घेत आहेत.

- कोल्हापुरात 50000 लोक सामील होतील असा अंदाज आहे.

- जगभरातील कार्पोरेट कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांनी यात सामील व्हावे म्हणून सुट्टी जाहीर केली आहे. सर्वांनी आपापल्या शहरात यात सामील व्हावे.

- हे कार्य व अद्ययावत शास्त्रीय रिपोर्ट FFF kolhapur या फेसबुक पेजद्वारे जाणून घेता येतील



## फ्रायडे फॉर फ्युचर - महाराष्ट्र

कार्बन फूटप्रिंट कमी करण्याची लोकचळवळ

**जगभरातील 7,000 विद्यापीठे आणि महाविद्यालये यांनी हवामान बदलाच्या विरोधी आणीबाणी जाहीर केली आहे आणि त्याच्याशी लढा देण्याचे ठरवले आहे**

**- 11 जुलै 2019.**

बुधवारी झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्यक्रमात "हवामानबदलाची आपत्कालीन परिस्थिती जाहीर करण्यासाठी आणि त्या अनुरूप त्वरित कारवाई करण्याचे आवाहन करणारे पत्रक संयुक्त राष्ट्र संघाच्या विविध संस्थांच्या द्वारे मांडण्यात आले. हा कार्यक्रम संयुक्त राष्ट्रसंघाच्या न्यू यॉर्क इथल्या मुख्यालयात झाला.

"जगातील सर्व सरकारांनी पर्यावरणाचा समतोल साधत कृती करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. आणि असे करणाऱ्या नेतृत्वाचे समर्थन करावे, असे आवाहन आम्ही करत आहोत", असे आयोजकांच्या निवेदनात म्हटले आहे.



"हवामान आपत्कालीन परिस्थितीवर उपाय म्हणून एकत्रितपणे वचनबद्ध होण्यासाठी उच्च शिक्षण संस्था एकत्र आल्या आहेत", आणि तीन मुद्द्यांच्या योजनेची रूपरेषा आखण्यात आली.

- 2030 किंवा 2050 पर्यंत, जे आधी शक्य होईल, कार्बन उत्सर्जन शून्य करण्याकरिता वचनबद्ध राहणे.

- कृती-आधारित हवामानबदल संशोधन आणि कौशल्य निर्मितीसाठी अधिक संसाधने एकत्र करणे.

- निसर्गभान आणि शाश्वत जीवनशैली याचा शैक्षणिक अभ्यासक्रमात सर्व पातळ्यांवर अंतर्भाव करून ते विविध कार्यक्रमांद्वारे सर्व समाजापर्यंत पोहचवणे.

युनो (जागतिक राष्ट्र संघ) यांनी जगभर शैक्षणिक संस्थांना यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

अधिक माहितीसाठी 'युनो'ची लिंक.
Scan QR code with 'google lens' for detailed news

